# मेट्रो कामाच्या आड येणाऱ्या वीज वाहिनीचे स्थलांतरण

म. टा. प्रतिनिधी, मुंबई



दहिसर पूर्व ते मिरा-भाईंदर मेट्रो-९ मार्गिकेच्या शहीद भगतसिंग स्थानकाच्या कामाच्या आड येणाऱ्या २२० केव्ही उच्चदाब वीज वाहिनीची जागा बदलण्याचे काम एमएमआरडीएने शनिवारपासून हाती घेतले आहे. डहाणू ते वर्सोवा अशी ही वीज वाहिनी आहे. पुढील १२ ते १५ दिवस हे काम चालणार आहे.

मेट्रो-९ मार्गिकेचे काम जलद गतीने पूर्ण करण्यासाठी एमएमआरडीएकडून हालचाली सुरू आहेत. या मेट्रो मार्गिकेच्या मिरा-भाईंदर येथील शहीद भगतसिंग नगर मेट्रो स्थानकाच्या कामात डहाणू येथून येणाऱ्या उच्चदाब वीज वाहिनीचा अडथळा येत होता. त्यामुळे या वीज वाहिनीची जागा बदलण्याचे काम एमएमआरडीएने हाती घेतले आहे. जुन्या पद्धतीने टॉवर उभारण्याऐवजी मोनोपोलवर ही वीज वाहिनी स्थलांतरित करण्यात येणार आहे. त्यासाठी या वीज वाहिनीचा पुढील १२ ते १५ दिवस वीजपुरवठा बंद करण्यात आला. ती अन्यत्र स्थलांतरित होत असल्याने मेट्रो मार्गिका आणि स्थानकाच्या कामातील अडथळ दूर होणार आहेत. तसेच स्थलांतरणानंतर स्थानकाच्या कामाला सुरुवात केली जाणार आहे. दरम्यान, वाहिनीची जागा बदलण्यात येत असली, तरी त्याचा वीजपुरवठ्यावर परिणाम होणार नाही, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.